# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

*जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर ,*
*४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे (पूर्व) ,मुंबई ५१.*
*फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९*
E-Mail: jtdirrom@gmail.com Web: http://mumbai.dte.org.in


**अत्यंत महत्वाचे व तातडीचे**

क्र.४/विकामुं/तंशि/तांत्रिक-३/२०२२/२४८८
दिनांक : 10 JUL 2024

प्रति,
प्राचार्य,
सर्व अभियांत्रिकी,औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र
पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था.
(मुंबई विभागा अंतर्गत)

विषयः- शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये अभियांत्रिकी, औषनिमार्णशास्त्र व वास्तुशास्त्र पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थेतील विद्यार्थ्याचे पहिल्या वर्षानंतर पाठयक्रम बदल,तसेच पहिल्या व दुस-या वर्षानंतर संस्था बदल करण्याबाबत

संदर्भः- १. मा.संचालक,तंत्रशिक्षण,म.रा.,मुंबई यांचे परिपत्रक क्र.२/एनजीसी/वि.सं.ब. /२०२४/४५८ दि.०८.०७.२०२४
२. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र.२एनजीसी/वि.सं.ब/२०२४ /४५९ दि.०८.०७.२०२४

उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, या विभागा अंतर्गत येणा-या अभियांत्रिकी,औषधनिर्माशास्त्र व वास्तुशास्त्र पदवी अभ्यासक्रम राबविणा-या विना अनुदानीत संस्थांनी संदर्भाकिंत पत्रात दिलेल्या निर्देशानुसार आपल्या संस्थेत प्रथम वर्षात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम बदल अथवा स्थलांतराने संस्थांबदल करावयाचा असल्यास तसेच दुस-या व तिस-या वर्षानंतर संस्था बदल करावयाचे असल्यास **संदर्भीय परिपत्रकात दिलेल्या निर्देशाचे पालन करुन आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.**

तसेच परिपत्रकातील टप्पा क्र. १ मधील तपशील (अ) मध्ये नमुद केल्या नुसार प्राचार्यांनी प्रथम वर्षाच्या किंवा प्रथम व व्दित्तीय सत्राच्या एकत्रित गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार शाखा बदलाची कार्यवाही **दि.१९.०७.२०२४ पर्यत पुर्ण केल्या नंतर** शाखा बदल करण्याकरीता तयार करण्यात आलेली गुणवत्ता यादी तसेच विद्यार्थ्याच्या अर्जाच्या व आवश्यक कागदपत्राच्या प्रतिची एक प्रत या कार्यालयास ई-मेल व्दारे सादर करण्यात यावी. तशी आवश्यक ती मंजूरी घेण्यात यावी.

तसेच ज्या विद्यार्थ्यांना संस्था बदल करुन घ्यावयाचा आहे. अशा विद्यार्थ्यांना ज्या संस्थेत प्रवेश घ्यावयाचा आहे. त्या संस्थेने या पत्रासोबत सादर केलेला विहित नमुण्यातील अर्ज देखील सादर करण्यात यावा तसेच आपल्या संस्थेत स्थलांतरणाने प्रवेश घेण्या-या विद्यार्थ्याचे अर्ज **दि.२३.०७.२०२४ पुर्वी** या कार्यालयास विहीत अर्ज आवश्यक कागदपत्रे ई-फाईल(PDF) मध्ये व Annexure B ची Microsoft Excel Sheet मधील Soft Copy सह प्रस्ताव ई-मेल व्दारे सादर करण्यात यावा.

विद्यार्थ्यांनी संस्थेत स्थलांतरनाने प्रवेश घेण्याकरीता सादर केलेले अर्ज नियमांचे पालन करुन आपल्या स्तरावर छानणी करुन आवश्यकत्या कागदपत्रासह संबधित प्रस्ताव या कार्यालयास एकत्रित रित्या (एका एका विद्यार्थ्याचा अर्ज सादर करु नये) सादर करण्यात यावीत.

विद्यार्थ्याने आपल्या संस्थेत संस्थास्थलांतरणाने प्रवेश मिळण्याकरीता अर्ज सादर केला असल्यास त्याबाबतचा पाठपुरावा करणेसाठी विद्यार्थ्यी अथवा पालकांस या कार्यालयात पाठविण्यात येऊ नये.

सोबत :-परिपत्रक व Annexure B ची प्रत

(प्रमोद अं. नाईक)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई-५१.

प्रत :- १. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांना माहिती करीता
२. श्री.भामरे, प्रोग्रॅमर सर्व संस्थांना सदरचे पत्र **ई-मेल** व्दारे पाठवीण्यात यावे